औद्योगिक धोरण

कोणत्याही देशातील उद्योगांचा सर्वांगीण व संतुलित विकास करण्यासाठी सरकारला नियोजनबद्ध रीतीने प्रयत्न करावे लागतात. या प्रयत्नांचाच एक भाग म्हणजे उद्योगांच्या विकासासाठी सुनियोजित, निश्चित आणि प्रेरणादायी असे औद्योगिक धोरण तयार करणे होय. "देशातील सरकार उद्योगधंद्यांशी ज्या प्रकारचे संबंध ठेवते त्या संबंधाला औद्योगिक धोरण असे म्हणतात." औद्योगिक धोरण तयार करताना देशात कोणत्या उद्योगांचा किती प्रमाणात विकास व विस्तार करावा, त्यांची स्थापना सार्वजनिक, खाजगी झी संयुक्त मालकीच्या क्षेत्रात करावी, व्यवस्थापन पद्धती कोणती असावी, खाजगी क्षेत्राची भूमिका काय राहील, या सर्वांचा आर्थिक विकासावर कोणता परिणाम होईल इत्यादी बाबींचा विचार करावा लागतो. सुनियोजित व सुनिश्चित औद्योगिक धोरणामुळे देशातील उद्योगांची संतुलित आणि वेगाने प्रगती घडून येते.

स्वातंत्र्यपूर्व काळात भारताचे सुनियोजित व सुनिश्चित असे औद्योगिक धोरण नव्हे. त्यामुळे स्वातंत्र्यापूर्वी भारताचा पुरेसा औद्योगिक विकास होऊ शकला नाही. १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाले परंतु पाकिस्तान भारतातून वेगळा करण्यात आला. पाकिस्तानच्या विभाजनामुळे भारतासमोर आर्थिक व औद्योगिक समस्या निर्माण झाल्यात. ह्या समस्या सोडविण्यासाठी व स्वतंत्र भारताचा जलद गतीने औद्योगिक विकास घडवून आणण्यासाठी एका निश्चित अशा औद्योगिक धोरणाची आवश्यकता होती. त्याकरिता डिसेंबर १९४७ मध्ये एक औद्योगिक संमेलन भरविण्यात आले व या संमेलनात एक प्रागतिक औद्योगिक घोरणाची घोषणा करण्यासंबंधी सरकारला शिफारस करण्यात आली. त्यानुसार भारत सरकारने ६ एप्रिल १९४८ आपले पहिले औद्योगिक धोरण जाहीर केले.

१९४८ चे औद्योगिक धोरण

भारत सरकारने ६ एप्रिल १९४८ ला आपले पहिले औद्योगिक धोरण घोषित केले. या औद्योगिक धोरणाद्वारे सरकारने औद्योगिक क्षेत्रात मिश्र अर्थव्यवस्था स्थापित करण्याचे निश्चित केले. या धोरणाप्रमाणे खाजगी क्षेत्र व सरकारी क्षेत्र दोहोंना उत्पादनाच्या क्षेत्रात वाव देण्यात आला. देशाचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी सरकारने पुढाकार घेऊन सरकारद्वारे उद्योग स्थापन करण्याचा निर्णय घेतला. खाजगी क्षेत्राला सामान्य औद्योगिक धोरणाच्या नियंत्रणाखाली औद्योगिक विकासात सहभागी करण्यात आले.

औद्योगिक धोरण १९४८

१९४८ च्या औद्योगिक धोरणाचे उद्देश पुढीलप्रमाणे होते.

(१) सर्वांना समान संधी मिळेल अशी सामाजिक व्यवस्था निर्माण करणे

(२) सर्वांना नोकऱ्या मिळतील अशी व्यवस्था करणे.

(३) राष्ट्रीय संसाधनांचा योग्य प्रमाणात उपयोग करणे.

(४) कृषी व औद्योगिक उत्पादन वाढविणे.

(५) समन्वित आर्थिक नियोजन आखणे व राबविणे.

(१) उद्योगांचे वर्गीकरण (Classification of Industries) - मिश्र अर्थ व्यवस्थेच्या मूलभूत विचाराच्या अनुरोधाने उद्योगांचे चार विभागात वर्गीकरण करण्यात आले.

(अ) सरकारी एकाधिकार क्षेत्र - राष्ट्रहिताच्या दृष्टीने केंद्र सरकारने काही उद्योगांचे स्वामित्व व नियंत्रण पूर्णपणे आपल्याकडे घेतले. यात शस्त्रास्त्रे, युद्धसामग्री निर्मिती, अणुशक्ती उत्पादन व नियंत्रण, रेल्वे मार्गाचे स्वामित्व व व्यवस्थापन इ. चा समावेश करण्यात आला. याशिवाय संकट काळात देशाच्या

संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण कोणताही उद्योग सरकार आपल्या ताब्यात घेऊ शकेल,

(ब) मिश्र क्षेत्र - या क्षेत्रात असे उद्योग ठेवण्यात आले ज्यात भविष्यकाळात सरकार हे उद्योग स्थापित करू शकेल. धोरण घोषित करताना या क्षेत्रात जे उद्योग खाजगी उद्योगपतीकडे होते ते त्यांच्याकडे राहू देण्यात आले, परंतु नवीन उद्योग सरकारद्वारे स्थापन करण्यात येतील. या श्रेणीमध्ये कोळसा, लोह, पोलाद, विमान बांधणी, जहाज बांधणी, टेलिफोन-वायरलेस, यंत्रसामग्री, खनिज तेल इ. चा समावेश करण्यात आला. या उद्योगाबद्दल असे स्पष्ट करण्यात आले की, या क्षेत्रातील चालू उद्योगांचे सरकारला वाटल्यास १० वर्षानंतर राष्ट्रीयीकरण करण्यात येईल व त्याचा मोबदला उद्योगपतींना देण्यात येईल. १० वर्षाच्या काळात या उद्योगांचा विस्तारदेखील करता येईल.

(क) सरकारी नियंत्रण व नियमनाचे क्षेत्र - या श्रेणीमध्ये मूलभूत महत्त्वाच्या उद्योगांचा समावेश करण्यात आला. यात प्रामुख्याने उपभोग्य वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या १८ प्रमुख उद्योगाचा समावेश करण्यात आला.

१९४८ चे औद्योगिक धोरण

भारत सरकारने ६ एप्रिल १९४८ ला आपले पहिले औद्योगिक घोरण घोषित केले. या औद्योगिक धोरणाद्वारे सरकारने औद्योगिक क्षेत्रात मिश्र अर्थव्यवस्था स्थापित करण्याचे निश्चित केले. या धोरणाप्रमाणे खाजगी क्षेत्र व सरकारी क्षेत्र दोहोंना उत्पादनाच्या क्षेत्रात वाव देण्यात आला. देशाचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी सरकारने पुढाकार घेऊन सरकारद्वारे उद्योग स्थापन करण्याचा निर्णय घेतला. खाजगी क्षेत्राला सामान्य औद्योगिक धोरणाच्या नियंत्रणाखाली औद्योगिक विकासात सहभागी करण्यात आले.

औद्योगिक धोरण १९४८

(१) सर्वांना समान संधी मिळेल अशी सामाजिक व्यवस्था निर्माण करणे

(२) सर्वांना नोकऱ्या मिळतील अशी व्यवस्था करणे.

(३) राष्ट्रीय संसाधनांचा योग्य प्रमाणात उपयोग करणे.

(४) कृषी व औद्योगिक उत्पादन वाढविणे.

(५) समन्वित आर्थिक नियोजन आखणे व राबविणे.

मिश्र क्षेत्र - या क्षेत्रात असे उद्योग ठेवण्यात आले ज्यात भविष्यकाळात सरकार हे उद्योग स्थापित करू शकेल. धोरण घोषित करताना या क्षेत्रात जे उद्योग खाजगी उद्योगपतींकडे होते ते त्यांच्याकडे राहू देण्यात आले, परंतु नवीन उद्योग सरकारद्वारे स्थापन करण्यात येतील. या श्रेणीमध्ये कोळसा, लोह, पोलाद, विमान बांधणी, जहाज बांधणी, टेलिफोन-वायरलेस, यंत्रसामग्री, खनिज तेल इ. चा समावेश करण्यात आला.

या उद्योगाबद्दल असे स्पष्ट करण्यात आले की, या क्षेत्रातील चालू उद्योगांचे सरकारला वाटल्यास १० वर्षानंतर राष्ट्रीयीकरण करण्यात येईल व त्याचा मोबदला उद्योगपतींना देण्यात येईल. १० वर्षाच्या काळात या उद्योगांचा विस्तारदेखील करता येईल.

सरकारी नियंत्रण व नियमनाचे क्षेत्र - या श्रेणीमध्ये मूलभूत महत्त्वाच्या उद्योगांचा समावेश करण्यात आला. यात प्रामुख्याने उपभोग्य वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या १८ प्रमुख उद्योगाचा समावेश करण्यात आला. या क्षेत्रातील उद्योग सरकारने आपल्या ताब्यात नाहीत, परंतु त्यांचे नियंत्रण व नियमन सरकार करील. या श्रेणीमध्ये मीठ, मशीन सामग्री, साखर, कागद, सिमेंट, रासायनिक उद्योग, अलोह धातू उद्योग, खनिज, रबर चा समावेश करण्यात आला. आवश्यकतेप्रमाणे हे सारे उद्योग वाढविण्याचा अधिकार मकारकडे देण्यात आला.

खाजगी क्षेत्र - या चौथ्या श्रेणीत बाकी सर्व उद्योग सामील करण्यात आले. या क्षेत्रात खाजगी व सरकारी संस्थांना काम करण्याची मुभा देण्यात आली. जर एखाद्या

विकास समाधानकारक नसेल तर सरकार हस्तक्षेप करू शकेल व नवीन उद्योग स्थापित करण्याकरिता या क्षेत्रात उतरू शकेल.

(२) कुटीर व लघु उद्योगांचे स्थान - स्थानिक बाजारपेठेतील उपलब्ध साधन जीचा जास्तीत जास्त उपयोग करण्यासाठी व स्थानीय स्तरावर रोजगार उपलब्ध करून यासाठी कुटीर व लघु उद्योगाचे राष्ट्रीय अर्थरचनेत असलेले महत्त्व मान्य करण्यात आले. गाचे विकेंद्रीकरण करण्याकरिता लघु उद्योग महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. कुटीर उद्योगाच्या अडचणी दूर करून त्यांच्या मालाला बाजारपेठ प्राप्त करून देण्यासाठी सरकारने पावले उचलण्याचे आश्वासन दिले.

(३) औद्योगिक श्रम संबंध - सरकारने मान्य केले की अधिकतम उत्पादन घेण्यासाठी अमिक व व्यवस्थापक यांचे सलोख्याचे संबंध राहिले पाहिजे, उत्पादनाच्या कार्यात श्रमिक व उद्योगपती भागीदार आहेत. याकरिता श्रमिकांना योग्य मजुरी, नफ्यात वाटा व कारखान्याच्या व्यवस्थापनात प्रतिनिधित्व देण्यात आले पाहिजे.

(४) विदेशी भांडवल - भारतातील औद्योगिकीकरणाची गती वाढविण्यासाठी उन्नत औद्योगिक तंत्र व ज्ञान प्राप्त करण्यासाठी विदेशी भांडवल व साहसाची आवश्यकता मान्य करण्यात आली. विदेशी भांडवलाचे स्वागत करण्यात येईल, पण त्याच्या अटी देशाच्या हिताच्या आहेत किंवा नाहीत हे तपासून बघण्यात येईल. सामान्यपणे स्वामित्व व प्रभावी नियंत्रणाचे अधिकार भारतीयांच्या हातात राहिले पाहिजे. भारतीय कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देऊन ते विदेशी कर्मचाऱ्यांची जागा घेऊ शकतील, असे धोरण ठेवले गेले पाहिजे. विदेशी भांडवल भागीदारीच्या

स्वरूपाचे राहील. स्वदेशी व विदेशी भांडवलात कोणताही फरक करण्यात येणार नाही. विदेशी भांडवल असलेल्या उद्योगाचे राष्ट्रीयीकरण केल्यास त्याचा योग्य मोबदला दिला जाईल.

(५) प्रशुल्क नीती - भारतीय प्रशुल्क नीती अशाप्रकारे असावी की ज्यामुळे भारतीय उद्योगांना विदेशी स्पर्धेपासून संरक्षण मिळेल. उपभोक्त्यावर या संरक्षण नीतीचा अवास्तव भार पाहू नये हा विचार ठेवण्यात येईल.

१९४८ च्या धोरणाचे मूल्य मापन

(१) खाजगी व सरकारी क्षेत्राच्या परस्पर सहयोगाने तीव्र गतीने औद्योगिक विकास करण्याकरिता मिश्र अर्थव्यवस्थेची मजबूत पायाभरणी या धोरणाने करण्यात आली.

(२) खाजगी व सरकारी क्षेत्राच्या कार्याची व कार्यक्षेत्राची स्पष्ट कल्पना देण्यात आली

(३) दहा वर्षानंतर राष्ट्रीयीकरणाच्या संकेतामुळे नवीन भांडवल विनियोजनासाठी भांडवलदार कचरू लागले. यामुळे काही उद्योगाच्या विकासावर विपरीत परिणाम झाला. प्रत्यक्षात असे दिसून आले की, राष्ट्रीयीकरणाचे पाऊल उचलण्याची सरकारची मनातून इच्छा नव्हती व त्याकरिता लागणारी साधनेदेखील सरकारजवळ नव्हती. राष्ट्रीयीकरणाची घोषणा प्रामुख्याने सैद्धांतिक दृष्टिकोन स्पष्ट करण्याकरिता केली गेली होती.

(४) या धोरणाचे वैशिष्ट्य हे मानावयास हवे की भारताच्या औद्योगिक इतिहासात पहिल्यांदाच जुन्या परंपरांना फाटा देण्यात आला. सरकारने राष्ट्रीय हिताला पोषक औद्योगिक धोरण आखून त्या धोरणाला यशस्वी करण्याकरिता नियम व कायदे बनविले सरकारने निरनिराळ्या महत्वाच्या विषयाबद्दल आपले निर्णय दिले. सरकारी व खाजगी क्षेत्राचा सहसंबंध स्पष्ट केला. राष्ट्रीयीकरणानंतर

क्षतिपूर्तिचे आश्वासन दिले, विदेशी भांडवलाची स्थिती स्पष्ट केली. सरकारने स्वतः औद्योगिक विकासाकरिता धडाडीने भाग घेऊन आपली जबाबदारी स्वीकारली.

(५) सार्वजनिक क्षेत्राचा विस्तार करण्याच्या उत्साहात अनेक प्रदेश सरकारांनी आपली शक्ती व साधनांचा विचार न करता नवीन कारखाने उभारण्याचे प्रयत्न केले. परंतु हे कारखाने लाभदायक ठरले नाहीत. सरकारी भांडवल त्यात अडकून पडले व बऱ्याच कारखान्यातनुकसान झाले.

(६) विदेशी भांडवलाला बऱ्याच सवलती व आमिषे दाखवूनही त्यांना आकर्षित करण्यात पुरेसे यश मिळाले नाही. राष्ट्रीयीकरणाची टांगती तलवार असल्यामुळे त्यांना भारतात भांडवल विनियोजन करण्यात उत्साह वाटला नाही.

(७) सरकारने ज्या योजना बनविल्या त्यांचे संचालन करण्याची शक्ती सरकारजवळ नव्हती. तंत्रज्ञ व तांत्रिक ज्ञानाच्या अडचणी व औद्योगिक प्रशासनाच्या अननुभवाचे दुष्परिणाम प्रारंभीच्या काळात भोगावे लागले.

१९५६ चे औद्योगिक धोरण

१९४८ मध्ये ठरविलेल्या औद्योगिक धोरणात देशाच्या बदलत्या परिस्थितीत लवकरच पुनर्विचार करण्याची आवश्यकता दिसून आली. भारताची नवीन घटना मंजूर झाली होती व या घटनेत राज्याकरिता निर्देशात्मक तत्त्वे स्पष्ट करण्यात आली. प्रथम पंचवार्षिक योजना राबविण्यात आली होती. १९५४ मध्ये भारताने 'समाजवादी समाज' रचनेचे आपले ध्येय स्वीकारले होते. स्वाभाविकपणे औद्योगिक धोरणाची नवीन तत्त्वांना अनुसरून फेर आखणी करणे क्रमप्राप्त होते. १९४८ च्या धोरणाच्या काही उणीवा दिसून आल्या होत्या. या सर्व गोष्टीचा विचार करून ३० एप्रिल १९५६ मध्ये भारत सरकारने औद्योगिक धोरणात काही महत्वाचे बदल करून नवीन धोरण घोषित केले.

१९५६ च्या घोरणाचे उद्देश

(१) आर्थिक विकास व औद्योगिकीकरणाची गती वाढविणे.

(2) सरकारी क्षेत्राचा विस्तार करणे.

(३) उत्पन्न व संपत्तीतील विषमता कमी करणे,

घोरणाची प्रमुख वैशिष्ट्ये

(1) औद्योगिक क्षेत्रांचे विभाजन - उद्योगाच्या क्षेत्रांची तीन भागात विभागणी करण्यात आली,

(अ) सार्वजनिक क्षेत्र - सरकारने सूची १ प्रमाणे १७ उद्योग आपल्या एकाधिकार क्षेत्रात ठेवले. या उद्योगांच्या विकासाची जबाबदारी पूर्णपणे सरकारची आहे. या उद्योगात शसास व सैन्य सामग्री, अणुशक्ती, लोखंड व पोलाद, विशाल/अवजड यंत्रसामग्री व विद्युत उपकरणे, खनिज तेल, मँगनीज, गंधक, सोने, विमान वाहतूक; जहाज निर्माण, टेलिफोन, विद्युत निर्मिती व वितरण इ. महत्त्वाचे उद्योग व सेवांचा समावेश करण्यात आला. याशिवाय राज्याच्या अन्य उद्योगांना आपल्या ताब्यात घेण्याचा अधिकार सुरक्षित ठेवण्यात आला. या क्षेत्रातील जुने खाजगी उद्योग चालू राहतील आणि त्यांच्या विकासात सरकार मदत करील. यात नवीन उद्योगाची स्थापना सरकार करील.

(ब) मिश्र क्षेत्र या श्रेणीत १२ उद्योगांचा समावेश करण्यात आला. या उद्योगाचा भविष्यकालीन विकास करण्याची जबाबदारी सरकारची राहील. परंतु खाजगी क्षेत्रालासुद्धा स्वत:च्या बळावर किंवा सरकारी प्रयत्नात मदत करण्याची मुभा देण्यात येईल. या उद्योगाची सूची बनविण्यात आली. या सूचीत अन्य खनिज, ॲल्युमिनियम, यंत्रसामग्री, फेरो अलॉय व औजारी पोलाद, आधारभूत औषधी निर्माण, रासायनिक खते, कृत्रिम रबर, रसायन उद्योग, रस्ता परिवहन इ. चा समावेश करण्यात आला.

(क) खाजगी क्षेत्र - अन्य सर्व उद्योग या श्रेणीत ठेवण्यात आले. यांचा विकास खाजगी क्षेत्रात करू देण्यात येईल. पंचवार्षिक योजनांच्या ध्येयधोरणाच्या कक्षेत या उद्योगाचा विकास व विस्तार खाजगी क्षेत्रात होण्यास सरकार मदत करील. याकरिता राज्य परिवहन, ऊर्जा आणि इतर सेवांचा विकास करील, संरक्षणाची व इतर जरूरी धोरणे अंमलात आणील. वित्तीय संस्थांचा विकास करील. शेतीच्या विकासाकरिता सहकारी तत्त्वावर उभारण्यात येणाऱ्या उद्योगांना विशेष मदत करण्यात येईल. याबरोबरच खाजगी क्षेत्राला पंचवार्षिक योजनांच्या आराखड्याप्रमाणे आणि औद्योगिक (विकास व नियमन) कायदा १९५१ च्या मयदित स्वत:ला बांधून घ्यावे लागेल.

औद्योगिक वर्गीकरण सहसंबंधित - १९५६ चे हे वर्गीकरण केल्या सरकारने स्पष्ट केले की, हे वर्गीकरण लवचीक आहे व हे सर्व वर्ग परस्परांशी सहसंबंधित आहेत. जेव्हा नियोजनाच्या किंवा इतर महत्त्वाच्या कारणामुळे सरकारला गरज भासेल तेव्हा सरकार कोणत्याही क्षेत्रात उद्योगाची स्थापना करू शकते. तसेच आवश्यकतेप्रमाणे सरकार खाजगी उद्योगांना कोणत्याही क्षेत्रात येण्याची परवानगी देऊ शकेल. दोन्ही क्षेत्राच्या सह अस्तित्वाला पूर्ण जागा आहे.

(३) कुटीरोद्योग व लघु उद्योगांना प्रोत्साहन - मोठ्या उद्योगांचे उत्पादन मर्यादित करणे, विभेदात्मक करारोपण आणि विविध प्रकारे सूट देऊन राज्य कुटीर व लघु उद्योगांना प्रोत्साहन देण्याचे धोरण चालू ठेवील. परंतु सरकारी धोरणाचा प्रयत्न राहील की विकेंद्रित क्षेत्र स्वावलंबी बनेल आणि त्यांचा विकास विशाल उद्योग क्षेत्रांशी समन्वित होण्याच्या दिशेने राहील. याकरिता लघु उद्योगांची स्पर्धा क्षमता वाढविण्याच्या उपायांवर सरकार भर देईल यासाठी उत्पादन तंत्रात सतत आधुनिकीकरण व विकास घडवून आणण्यात येईल. या परिवर्तनामुळे तांत्रिक बेकारी वाढू नये, असा प्रयत्न करण्यात येईल. औद्योगिक वसाहतींची

स्थापना करणे, ग्रामीण कार्यशाळा, ग्रामीण क्षेत्रात विद्युतीकरण व स्वस्त दरात वीजपुरवठा इ. द्वारे मदत करण्यात येईल.

(४) प्रादेशिक असंतुलन दूर करणे - औद्योगिकीकरणाचा फायदा देशभर मिळावा म्हणून निरनिराळ्या प्रादेशिक क्षेत्रातील औद्योगिक विकासाची विषमता दूर करण्याची गरज आहे. ज्या क्षेत्रात औद्योगिकीकरण मागे आहे तेथे परिवहन, वीज आणि इतर सोयींचा विकास करण्यात येईल. ज्या क्षेत्रात रोजगाराची अधिक आवश्यकता आहे तेथे उद्योग स्थापनेला प्राथमिकता देण्यात येईल. औद्योगिकदृष्ट्या मागासलेल्या भागाच्या विकासाकडे विशेष लक्ष दिले जाईल.

(५) श्रम संबंध - या धोरणामध्ये श्रमिकांच्या राहण्याच्या व कामाच्या दशेत सुधारणा करण्याची व त्यांची कार्यक्षमता वाढविण्यावर जोर देण्यात आला आहे. उद्योग संचालनात श्रमिकांना सहभागी करून घेणे जरूरी आहे. सरकारी क्षेत्रातील उद्योग या बाबतीत आदर्श घालून देतील, अशी आशा करण्यात आली आहे.

(६) विदेशी भांडवल - देशाच्या आर्थिक विकासात विदेशी भांडवलाची आवश्यकता मान्य करण्यात आली. विदेशी भांडवलदारांना आश्वासन देण्यात आले की, त्यांचे भांडवल सुरक्षित राहील व त्यांना विनियोजनाकरिता सोयी देण्यात येतील.

(७) सहकारी क्षेत्र - जेथे शक्य असेल तेथे तेथे वाढत्या प्रमाणावर सहकारी तत्त्वाच्या आधारे विकास करण्याचा प्रयत्न करण्यात यावा.

(८) तांत्रिक व व्यवस्थापन शिक्षण औद्योगिक विकासासाठी तांत्रिक ज्ञान व= व्यवस्थापन यांची आवश्यकता असते. भारतात याची उणीव आहे. म्हणून आवश्यक प्रशिक्षणाच्या सोयी वाढविण्याकडे लक्ष दिले जाईल.

१९५६ व्या धोरणाचे टीकात्मक परीक्षण

(१) खाजगी क्षेत्राची उपेक्षा - या धोरणात सरकारने खाजगी क्षेत्र अतिशय संकुचित केले असून सार्वजनिक क्षेत्रावर अत्याधिक भर दिला आहे. वास्तविकत: पहिल्या पंचवार्षिक योजनेत सार्वजनिक क्षेत्राच्या तुलनेत खाजगी क्षेत्रानेच चांगली प्रगती केली. तरीपण या धोरणात खाजगी क्षेत्रावर जास्त नियंत्रणे लादून अन्याय केला आहे.

(२) खाजगी क्षेत्रात सरकारी हस्तक्षेप - या धोरणानुसार (अ) आणि (ब) सूचीतील उद्योग सोडून बाकी सर्व उद्योग खाजगी क्षेत्राकरिता मोकळे सोडले होते. परंतु या धोरणात सरकारला आवश्यक वाटल्यास इतर क्षेत्रातील उद्योग स्थापन करण्याची मुभा दिली होती. त्यामुळे खाजगी क्षेत्रात हस्तक्षेप केल्याचे दिसून येते.

(3) विदेशी भांडवलासंबंधी अस्पष्टता - या धोरणात विदेशी भांडवलासंबंधी स्पष्ट उल्लेख नसल्यामुळे व सरकारच्या राष्ट्रीयीकरणाचे क्षेत्र निश्चित नसल्यामुळे विदेशी डवलदारांनी भारतात भांडवल गुंतविण्यात पुढाकार घेतला नाही.

(४) राजकीय एकाधिकार निर्माण होण्याची शक्यता - संपूर्ण मूलभूत व महत्त्वाचे उद्योग सार्वजनिक क्षेत्राकरिता राखून ठेवण्यात आल्यामुळे या उद्योगांच्या बाबतीत राजकीय (सरकारी) एकाधिकार निर्माण होण्याची शक्यता होती. खाजगी एकाधिकार निर्माण झाला तर त्यावर नियंत्रणे तरी लावता येतात, परंतु राजकीय एकाधिकार तर नियंत्रणरहितच असतो.

(५) सहकारी त्त्वाच्या पडद्याआड राजकीय भांडवलवाद - भारतीय सहकारी चळवळीला सरकारी मदतीची नेहमीच आवश्यकता असते. त्याशिवाय सहकारी चळवळ एक पाऊल पुढे जाऊ शकत नाही. त्यामुळे सहकारितेच्या पडद्याआड राजकीय भांडवलवाद फोफावण्याची शक्यता असते.

१९७० चे औद्योगिक धोरण

भारताच्या औद्योगिक धोरणाचे व परवाना समितीने केलेल्या कार्याचे मूल्यमापन करण्याकरिता व त्यात काही सुधारणा सुचविण्याकरिता भारत सरकारने अनुक्रमे प्रा. हजारी व श्री. दत्त यांच्या अध्यक्षतेखाली दोन वेगवेगळ्या समित्या नियुक्त केल्या. या दोन्ही समित्यांनी दिलेल्या अहवालात असे स्पष्ट केले आहे की, देशातील आर्थिक मक्तेदारी नष्ट करण्याच्या दृष्टीने १९५६ चे औद्योगिक धोरण निरुपयोगी ठरले आहे. भारतातील बड्या भांडवलदारांनी या धोरणाचा अत्यंत चाणाक्षपणे व कौशल्याने दुरुपयोग करून घेतला आहे. म्हणून भारताचे औद्योगिक धोरण अधिक वास्तववादी व उपयुक्त करण्याच्या दृष्टीने त्यात काही सुधारणा करणे आवश्यक झाले आहे.

भारताच्या औद्योगिक धोरणात सुधारणा करण्याच्या दृष्टीने दत्त समितीने आपल्या अहवालात महत्त्वपूर्ण शिफारशी केल्यात. त्या शिफारशीच्या आधारावर भारत सरकारने फेब्रुवारी १९७० मध्ये नवीन औद्योगिक धोरण जाहीर केले.

१९७० व्या औद्योगिक धोरणाची वैशिष्ट्ये

(१) उद्योगांचे नवीन वर्गीकरण - सर्व उद्योगांचे एकूण पाच भागात विभाजन करण्यात आले.

(अ) महत्त्वपूर्ण किंवा आधारभूत उद्योगांचे क्षेत्र - या क्षेत्रात आधारभूत व महत्त्वाचे उद्योग ठेवण्यात आले आहेत. हे सर्व उद्योग सरकारी मालकीचे राहतील. पंचवार्षिक योजने या उद्योगांना सर्व बाबतीत अग्रक्रम दिला जाईल.

(ब) विशाल गुंतवणुकीचे संयुक्त क्षेत्र या क्षेत्रात ५ कोटी रु. पेक्षा जास्त गुंतवणूक असलेल्या उद्योगांचा समावेश करण्यात आला आहे. ह्या उद्योगांची स्थापना करण्याकरिता सरकार पुढाकार घेईल. परंतु काही कारणामुळे सरकारला

ते शक्य झाले नाही तर खाजगी उद्योगपतींना परवानगी देण्यात येईल व सरकार त्याकरिता आवश्यक ती मदत देईल

(क) मध्यम उद्योगांचे क्षेत्र - या क्षेत्रात ५ कोटी रु. पेक्षा कमी, परंतु ? क १ रु. पेक्षा जास्त गुंतवणूक असलेल्या उद्योगांचा समावेश करण्यात आला. या उद्योगांची स्थापना करण्याकरिता केंद्र सरकारकडून परवाना मिळविणे आवश्यक आहे. परवाने देताना सरकार लहान उद्योगपतींना प्राधान्य देईल.

(ड) लघु उद्योगाचे क्षेत्र - या क्षेत्रात १० लाख रुपयांपर्यंत स्थिर संपत्तीत गुंतवणूक करणाऱ्या उद्योगांचा समावेश करण्यात आला आहे. पूरक उद्योगांकरिता ही मर्यादा १५ लाख रुपयांपर्यंत वाढविण्यात आली आहे. या उद्योगांना पूर्वीप्रमाणेच संरक्षण दिले जाईल.

(ई) सहकारी उद्योगांचे क्षेत्र - जे उद्योग कृषी मालावर आधारित आहेत (कापड, साखर, ज्यूट इत्यादी) असे उद्योग सहकारी क्षेत्रात उघडण्याचा प्रयत्न केला जाईल व परवाने देताना अशी दक्षता घेतली जाईल.

(२) परवाना मुक्त मर्यदित वाढ - पूर्वी १ कोटी किंवा त्यापेक्षा कमी भांडवल लागणार्या उद्योगांना परवाना मिळविण्याची आवश्यकता नव्हती. आता ही मर्यादा ३ कोटी रुपयांपर्यंत वाढविण्यात आली आहे.

(३) परवाना पद्धतीत सुधारणा - पूर्वीची परवाने देण्याची पद्धती अत्यंत गुंतागुंतीची व बराच काळ घेणारी होती. आता त्यात सुधारणा करण्यात आली आहे. या धोरणात असे स्पष्ट करण्यात आले की, परवान्याकरिता आलेल्या अर्जाचा जास्तीत जास्त ६ आठवड्यांच्या आत निकाल लावला जाईल. ते ८

(४) मागास राज्यांच्या विकासावर भर - स्वातंत्र्योत्तर काळात भारतात औद्योगिक विकासाच्या बाबतीत प्रादेशिक विषमता मोठ्या प्रमाणावर निर्माण झाली.

ही प्रादेशिक विषमता दूर करण्यासाठी मागास राज्याच्या विकासावर भर देण्यात येईल

१९७३ चे औद्योगिक धोरणाची प्रमुख वैशिष्ट्ये

(१) सहकारी क्षेत्राचा विस्तार - देशात समाजवादी समाजरचना निर्माण करण्यासाठी सहकारी क्षेत्राचा विस्तार करण्याचा मनोदय व्यक्त करण्यात आला आणि त्यानुसार लोकोपयोगी सेवा, उपभोग्य वस्तूंचे उद्योग व मोठ्या गुंतवणुकीचे उद्योग सहकारी क्षेत्रात समाविष्ट करण्यात आले.

(२) संयुक्त क्षेत्राबाबत सरकारची भूमिका - संयुक्त क्षेत्रातील उद्योगाची स्थापना सरकार किंवा खाजगी उद्योगपतीद्वारे केली जात असली तरी अशा उद्योगांच्या बाबतीत धोरण ठरविण्याचे, निर्णय घेण्याचे व उद्योगांच्या रचनेत फेरबदल करण्याचे सर्व अधिकार सरकारकडेच राहतील.

(३) विदेशी भांडवलाबद्दल स्पष्टीकरण १९७३ च्या धोरणात कोणत्या उसोगांमध्ये विदेशी भांडवल गुंतविले जाईल ते स्पष्ट करण्यात आले व अशा उद्योगांची एक यादी प्रसिद्ध करण्यात आली.

(४) मोठ्या घराण्यांची मर्यादा - १९७३ च्या औद्योगिक धोरणात ज्या औद्योगिक घराण्यांचे निरनिराळ्या उद्योगात गुंतविलेले भांडवल २० कोटी रु. पेक्षा जास्त आहे. अशा घराण्यांचा समावेश मोठ्या घराण्यांमध्ये करण्यात आला आहे. पूर्वी ही मर्यादा ५ कोटी रुपयांची होती.

(4) मोठ्या घराण्यांच्या क्षेत्रात वाढ - मोठ्या औद्योगिक घराण्यांना कोणते उद्योग स्थापन करता येतील यासंबंधी एक सूची तयार करण्यात आली आहे. त्यात आधारभूत व महत्त्वपूर्ण उद्योगांशिवाय कागद, सिमेंट इत्यादी उद्योगांचाही समावेश करण्यात आला आहे. १९७३ चे नवीन औद्योगिक धोरण तयार करताना देशाच्या औद्योगिक विकासाकरिता खाजगी उद्योगपतींच्या बुद्धिमत्तेचा, कौशल्याचा

व भांडवलाचा पुरेपूर वापर करता येईल व त्याबरोबरच खाजगी मक्तेदारीवर नियंत्रण ठेवता येईल असाक दृष्टिकोन ठेवण्यात आला होता.

१९७७ चे जनता सरकारचे औद्योगिक धोरण

(१) भारताच्या औद्योगिक संरचनेत मागील १० वर्षात निर्माण झालेल्या अनिष्ट प्रवृत्ती दूर करणे.

(२) देशातील नैसर्गिक व विशेषतः मानवी संसाधनांचा महत्तम उपयोग करण्याच्या दृष्टीने एक समयबद्ध कार्यक्रम तयार करणे.

(३) समाजाच्या खालच्या स्तरातील लोकांना आर्थिक विकासाचा फायदा मिळेल,

(१) मानवी संसाधनांना अधिक महत्त्व - या पूर्वीच्या औद्योगिक धोरणात नवीन उद्योगांची स्थापना व जुन्या उद्योगांचा विकास याच गोष्टीवर भर देण्यात आला. परंतु मानवी । संसाधनांचा विचार करण्यात आला नव्हता. त्यामुळे आर्थिक विकासाची मानवी बाजू दुर्लक्षित राहिली. म्हणून जनता सरकारने आपल्या औद्योगिक धोरणात मानवी बाजूलाच केंद्र बंदू मानून मानवी श्रमाच्या महत्तम वापराला अग्रक्रम दिला.

(२) कुटीर व लघु उद्योगांचा विकास - देशातील बेकारी व अर्धबेकारीची समस्या सोडविण्यासाठी ग्रामोद्योग व कुटीर उद्योगांना प्राधान्य देण्यात आले. या औद्योगिक धोरणानुसार ५०४ वस्तूंचे उत्पादन कुटीर व लघु उद्योगांमध्ये केले जाईल. ज्या वस्तूंचे उत्पादन कुटीर व लघु उद्योगात केले जाते त्या वस्तूंचे उत्पादन करण्यास मोठ्या उद्योगांना मनाई करण्यात आली आहे.

(३) अति लहान उद्योगक्षेत्र ज्या लघु उद्योगांच्या संपत्तीमध्ये १ लाख रुपयांपेक्षा कमी भांडवल गुंतविण्यात आले आहे व ज्यांची स्थापना ५० हजारापेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या खेड्यात करण्यात आली आहे अशा उद्योगांचा समावेश

अति लहान उ क्षेत्रामध्ये (Tiny Sector) करण्यात आला. या क्षेत्रातील उद्योगांना सरकारकडून कमी व्याजाच्या दराने कर्ज पुरवठा करण्यात येईल.

(४) जिल्हा औद्योगिक केंद्राची स्थापना - ग्रामीण भागात कुटीर व लघु उद्योगांचा विकास जलद गतीने व्हावा या दृष्टीने प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी औद्योगिक केंद्राची स्थापना करण्याचे ठरविण्यात आले. या जिल्हा औद्योगिक केंद्राद्वारे लघु उद्योजकांना विविध विषयांवरील माहिती पुरविणे, मार्गदर्शन करणे, जमीन, पाणी, वीज व कर्ज पुरवठा करणे इत्यादी कार्ये पार पाडली जातील.

(५) लघु व ग्रामोद्योगांना कर्ज पुरवठा - भांडवला अभावी लघु व कुटीर उद्योगांच्या विकासाची कोणतीही योजना खोळंबून राहू नये याकरिता पुरेसा कर्ज पुरवठा करणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने औद्योगिक विकास बँक व राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये कर्ज पुरवठ्यासाठी स्वतंत्र विभाग उघडण्यात येतील.

(६) खादी व हातमागाचा विकास - या औद्योगिक धोरणानुसार खादी व हातमागाच्या क्षेत्रात वाढ करण्यात आली असून खादी व ग्रामोद्योग मंडळाला आपले कार्य प्रभावीपणे पार पाडता यावे ह्याकरिता व्यवस्थापन पद्धतीत आवश्यक ते बदल करण्यात येतील.

(७) मोठ्या उद्योगांची क्षेत्र निश्चिती जनता सरकारच्या औद्योगिक धोरणाने लघु व कुटीर उद्योगाप्रमाणेच मोठ्या उद्योगाचे क्षेत्र निश्चित केले आहे. या क्षेत्रात लोखंड व पोलाद उद्योग, सिमेंट उद्योग, तेल शुद्धीकरण उद्योग, यंत्रनिर्मिती उद्योग, रसायन उद्योग इत्यादी उद्योगांचा समावेश करण्यात आला आहे.

(८) बड्या औद्योगिक घराण्यांवर प्रतिबंध आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण टाळण्यासाठी बड्या औद्योगिक घराण्यांच्या व्यवसायावर प्रतिबंध लावण्याची आवश्यकता आहे असे या धोरणात नमूद करण्यात आले. त्यासाठी मक्तेदारी

विरोधी कायद्याची कडक अमलबजावणी करून बड्या घराण्यांच्या उद्योग विस्तारावर प्रतिबंध लावण्याचे प्रयत्न केले जातील.

(९) सार्वजनिक क्षेत्राचा विस्तार - यापूर्वी उपभोग्य वस्तूंचे उत्पादन सार्वजनिक क्षेत्रात केले जात नव्हते. परंतु या औद्योगिक धोरणानुसार ज्या उपभोग्य वस्तूंचा पुरवठा गरजेपेक्षा कमी आहे अशा वस्तूंचे उत्पादन सार्वजनिक क्षेत्रात केले जाईल.

(10)विदेशी भांडवलदार निर्बंध - राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने जेथे विदेशी भांडवलाची आवश्यकता आहे तेथेच विदेशी भांडवलाच्या गुंतवणुकीला परवानगी दिली जाईल. "विदेशी विनिमय नियमन" कायद्यानुसार कोणत्याही विदेशी कंपनीला ४० टक्क्यांपेक्षा जास्त विदेशी भांडवलाची गुंतवणूक करता येणार नाही, असे या धोरणात नमूद करण्यात आले. त्याचप्रमाणे भारतातून विदेशात भांडवलाची निर्यात केली जात असेल तर त्यावरसुद्धा नियंत्रणे लावण्यात येतील.

(११) आजारी उद्योगांचा प्रश्न - भारतात दरवर्षी अनेक लहान-मोठे उद्योग आजारी पडतात. असे आजारी पडणारे सर्वच उद्योग सरकार आपल्या ताब्यात न घेता काही निवडक योगच आपल्या नियंत्रणात घेईल व या उद्योगांचे पुनरुज्जीवन करण्याकरिता सरकार तातडीने उपाययोजना करील. उद्योगांच्या आजारपणाची कारणे शोधून काढण्यात येतील व देशामधील उद्योग आजारी पडू नयेत, याकरिता उपाययोजना करण्यात येईल.

१९८० चे औद्योगिक धोरण

जानेवारी १९८० मध्ये काँग्रेस (आय) पक्षाचे सरकार सत्तेवर आल्यानंतर केंद्रीय उद्योग राज्यमंत्री श्री. चरणजीत चनाना यांनी २३ जुलै १९८० रोजी नवीन औद्योगिक धोरणाची घोषणा केली. त्यांनी या नवीन औद्योगिक धोरणाची उद्दिष्टे प्रतिपादन केली ती पुढीलप्रमाणे आहेत -

(१) देशातील उद्योगांच्या प्रस्थापित क्षमतेचा महत्तम उपयोग करून घेणे.

(२) उत्पादनात वाढ करून उत्पादकतेची महत्तम पातळी साध्य करणे.

(३) औद्योगिक क्षेत्रात विस्तृत प्रमाणावर रोजगाराच्या संधीची निर्मिती करणे.

(४) प्रादेशिक असंतुलन दूर करण्याकरिता मारगासप्रदेशांच्या औद्योगिकीकरणाला चालना देणे.

(५) कृषी क्षेत्राचा पाया सुदृढ करण्यासाठी कृषीवर आधारित उद्योगांच्या विकासाला विशेष प्राधान्य देणे.

(६) ज्या उद्योगांच्या विकासामुळे निर्यातीत वाढ होईल आणि आयात कमी होईल, अशा उद्योगांचा जलद गतीने विकास घडवून आणणे.

(७) वाजवी किमतीत चांगल्या प्रतिच्या वस्तू उपभोक्त्यांना मिळू व्यवस्था करणे.

१९८० च्या नवीन औद्योगिक धोरणाची ठळक वैशिष्ट्ये

(१) सार्वजनिक उपक्रमाच्या व्यवस्थापनात सुधारणा - भारतातील बहुसंख्य सार्वजनिक उपक्रम अकार्यक्षम व्यवस्थापनामुळे तोट्यात चालत असल्याचे दिसून येतात. त्यामुळे अलीकडील काळात सार्वजनिक उपक्रमांच्या क्षमतेविषयी लोकांच्या मना असलेला विश्वास अत्यंत वेगाने कमी होत आहे. नवीन औद्योगिक धोरणामध्ये या बाही े लक्ष पुरविण्यात आले आहे, नवीन औद्योगिक धोरणानुसार केंद्र सरकारचा उद्योग विभाग प्रत्येक सार्वजनिक उपक्रमाचे स्वतंत्रपणे व अत्यंत बारकाईने परीक्षण करून ह्या उपक्रमाला तोटा का येतो याची कारणे शोधून काढील व ही कारणे दूर करण्यासाठी तसेच उपक्रमाच्या व्यवस्थापनात सर्वांगीण सुधारणा घडवून आणण्यासाठी व्यापक उपाययोजना सुचवील.

(२) खाजगी उपक्रमांना साहाय्य मागील धोरणामध्ये खाजगी क्षेत्राच्या विस्ताराबद्दल जी तत्त्वे स्वीकारण्यात आली होती तीच तत्त्वे १९८० च्या नवीन औद्योगिक धोरणामध्येही मान्य करण्यात आली आहेत. परंतु सरकारची धोरणे व पंचवार्षिक योजनांची उद्दिष्ट्ये ह्या दोन्ही बाबी विचारात घेऊन केंद्र सरकार खाजगी क्षेत्रातील उपक्रमांना सहाय्य करताना मक्तेदारीत वाढ होणार नाही तसेच आर्थिक सत्तेचे व संपत्तीचे केंद्रीकरण होणार नाही, याची दक्षता घेणार आहे.

(३) विकेंद्रित उद्योगांच्या गुंतवणूक मर्यादित वाढ - १९८० च्या औद्योगिक धोरणांमध्ये अती लहान उद्योग, लघु उद्योग व पूरक उद्योगाच्या गुंतवणुकीच्या किमान मर्यादेमध्ये वाढ करण्यात आली आहे. अति लहान किंवा दुय्यम उद्योगांची गुंतवणूक मर्यादा १ लाख रु. वरून २ लाख रु., लघु उद्योगांची १० लाख वरून २० लाख रु. पर्यंत आणि पूरक उद्योगांची गुंतवणूक मर्यादा १५ लाख रु. वरून २० लाख रु. पर्यंत वाढविण्यात आली.

(४) विकेंद्रित क्षेत्रातील उद्योगांना पत पुरवठा १९८० च्या औद्योगिक धोरणानुसार सरकारने विकेंद्रित क्षेत्रातील उद्योगांना पर्याप्त प्रमाणात पत पुरवठा करण्यासाठी विशेष प्रकारचे प्रयत्न करण्याचे ठरविले आहे.

(५) सामग्री संग्रहणाची योजना - लघु व कुटीर उद्योगांचा कच्च्या मालाचा प्रश्न सोडविण्यासाठी सरकार राष्ट्रीय लघु उद्योग महामंडळ आणि लघुउद्योग विकास महामंडळ यांच्या साहाय्याने कच्चा माल व इतर आवश्यक सामग्रीचे साठे निर्माण करील. उद्योगांच्या आवश्यकतेनुसार त्यांना या साठ्यामधून कच्चा माल व इतर आवश्यक सामग्रीचा पुरवठा करण्यात येईल.

१९८० च्या औद्योगिक धोरणाचे टीकात्मक परीक्षण

(१) उद्दिष्टे नवीन नाहीत - १९८० च्या औद्योगिक धोरणाची जी उद्दिष्ट्ये प्रतिपादन करण्यात आली, त्यात नावीन्य असे काहीच नाही. मागील

धोरणाप्रमाणेच जुनीच उद्दिष्टे केवळ शब्दांची फिरवाफिरव करून नव्याने मांडण्यात आली आहेत. मागील धोरणाच्या अंमलबजावणीमुळे बेकारी वाढत गेली, विभागीय विषमता वाढली तसेच आर्थिक विषमता बादली. १९८० च्या औद्योगिक धोरणामुळे यापेक्षा काही वेगळे घडून येईल, असे वाटत नाही.

(२) बोगस व बेनामी लघुउद्योगांची स्थापना - १९७६ च्या आकडेवारीनुसार भारतात एकूण २.५८ लाख लघु उद्योगांची नोंदणी झाली होती. परंतु त्यापैकी फक्त १.४ लाख उद्योगच प्रत्यक्ष कार्यरत होते. म्हणजेच जवळपास ५० टक्के लघुउद्योग बोगस होते. १९८० च्या औद्योगिक धोरणांमध्ये लघु उद्योगाच्या गुंतवणूक मर्यादेत वाढ करण्यात आली.

(३) श्रमप्रधान लघु उद्योगांवर विपरीत परिणाम- १९८० च्या औद्योगिक धोरणात लघु उद्योगाच्या गुंतवणूक मर्यादेत वाढ केल्यामुळे अनेक नवीन भांडवलप्रधान लघु उद्योगांची स्थापना होईल व हे उद्योग जुन्या व कमी भांडवलावर स्थापन झालेल्या श्रमप्रधान उद्योगांशी । स्पर्धा करू लागतील, भांडवलप्रधान लघु उद्योगाच्या स्पर्धेत श्रमप्रधान लघु उद्योग टिकू शकणार नाहीत. परिणामतः श्रमप्रधान लघु उद्योगाच्या विकासावर विपरीत परिणाम घडून येईल.

(४) बेकायदेशीर उत्पादन क्षमतेला मान्यता - या धोरणामध्ये मोठ्या उद्योगातील प्रस्थापित क्षमतेपेक्षा जास्त असलेली बेकायदेशीर उत्पादन क्षमता नियमित करण्यात आली. अशाप्रकारे मोठ्या उद्योगांची मान्यता प्राप्त नसलेली उत्पादन क्षमता विकसित केल्यामुळे । हे उद्योग आपल्या उत्पादनात वाढ करून प्रचंड नफा मिळविण्याची शक्यता आहे. त्यामुळे आर्थिक विषमतेत वाढ होईल, अशी अपेक्षा आहे.

(५) मक्तेदारीत वाढ - प्राधान्य क्रमाच्या नावाखाली मोठ्या उद्योगांना अनेक सवलती दिल्या गेल्यास त्या उद्योगांची मक्तेदारी स्थापन होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

(६) आजारी उद्योगात वाढ - भारतात उद्योग आजारी पडण्यापेक्षा उद्योग आजारी पाडण्याचे प्रमाण अधिक आहेत. १९८० च्या औद्योगिक धोरणांमध्ये असे आजारी उद्योग ताब्यात घेऊन राज्य सरकार त्याची आर्थिक जबाबदारी स्वीकारील, असे सुचविले आहे परंतु उद्योग आजारी पाडणाऱ्यांवर कोणती कारवाई केली जाईल हे काहीच स्पष्ट केले नाही. अशाप्रकारे या धोरणानुसार आजारी उद्योगांना सरकारचे आर्थिक संरक्षण मिळते असे उद्योगपतींना समजल्यामुळे ते आता अनेक नवीन उद्योगांना आजारी पाडण्याची शक्यता आहे. त्यामुळे आजारी उद्योगांच्या संख्येत वाढ होऊ शकते.

(७) रोजगार व उत्पादनवाढीत अपयश - भारतात भांडवल-उत्पादनाचे प्रमाण ६ टक्के आहे. परंतु विकास दर मात्र ३ ते ३.५ टक्के आहे. देशातील रोजगार व उत्पादनात वाढ करण्यासाठी विकास दरात वाढ करणे आवश्यक आहे. विकास दरात वाढ करणे हे आपल्या योजनेचे उद्दिष्ट आहे, परंतु १९८० च्या औद्योगिक धोरणात याबाबत काहीच उल्लेख नसल्यामुळे रोजगार व उत्पादन वाढीत फारसे यश मिळण्याची शक्यता वाटत नाही.

१९९१ चे नवीन औद्योगिक धोरण

२४ जुलै १९९१ रोजी भारत सरकारने नवीन औद्योगिक धोरण घोषित केले. ह्या नवीन धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे भारतीय अर्थव्यवस्थेला जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडण्याच्या दृष्टीने आवश्यक असे उदारीकरणाचे धोरण स्वीकारणे होय. त्यामुळे हे धोरण, बरेच उदारमतवादी ठेवण्यात आले. यात परवाना पद्धती जवळपास समाप्त करण्यात आला. बरेचसे राखीव उद्योग खाजगी क्षेत्रात सुरू

करण्याची परवानगी देण्यात आली. एकाधिकार आणि प्रतिबंधक व्यापार व्यवहार (M.R.T.P.) अधिनियमातील उद्योगाच्या संपत्तीची मर्यादा समाप्त करण्यात आली आणि कंपन्यांना अधिक सवलती देण्यात आल्या.

१९९१ मध्ये काँग्रेस सरकारद्वारे जे औद्योगिक धोरण जाहीर करण्यात आलेले होते, त्या धोरणात पुढील क्षेत्रासंबंधी धोरणांचा समावेश होता. यांनाच नवीन औद्योगिक धोरणाची वैशिष्टये म्हणता येईल.

(१) औद्योगिक परवाना धोरण

(२) विदेशी गुंतवणुकीसंबंधी धोरण

(३) विदेशी तंत्रज्ञानासंबंधी धोरण

(४) सार्वजनिक क्षेत्रासंबंधी धोरण

(५) एकाधिकार आणि प्रतिबंधात्मक व्यापार कायद्यासंबंधी धोरण.

१९९१ चे औद्योगिक धोरण

या दृष्टीने भारत सरकारने आपल्या नवीन परवाना धोरणाच्या अंतर्गत पुढील उपाययोजना केली आहे.

(1) देशाची सुरक्षा व युद्धतंत्राशी संबंधित उद्योग, सामाजिक सुरक्षेशी संबंधित उद्योग, धोकादायक रसायनांचे उद्योग, पर्यावरणासंबंधी कारणांशी संबंधित उद्योग आणि उपभोगाशी संबंधित उद्योगांना वगळता, इतर उद्योगांना औद्योगिक परवाना प्राप्त करण्याची गरज राहणार नाही.

(ii) संरक्षण व युद्धतंत्राशी संबंधित उद्योग सरकारी क्षेत्रासाठी सुरक्षित ठेवले जातील.

(iii) ज्या उद्योगांना आयात कराव्या लागणाऱ्या भांडवली वस्तूंची गरज आहे, त्यांना आपोआप स्वीकृती दिली जाईल.

(iv) ज्या शहरांची लोकसंख्या १० लक्षांपेक्षा कमी आहे, अशा शहरांमध्ये नवीन उद्योग स्थापन करण्यासाठी केंद्र सरकारकडून परवाना प्राप्त करण्याची गरज राहणार नाही. अर्थातच जे उद्योग कोठेही परवाना प्राप्त केल्याशिवाय स्थापन केले जाऊ शकत नाहीत त्यांना हे लागू होणार नाही. ज्या शहरांची लोकसंख्या १० लक्षांपेक्षा जास्त आहे अशा शहरात फक्त प्रदूषणमुक्त उद्योग सोडून इतर उद्योग शहरापासून कमीत कमी २५ किलोमीटर अंतरावर स्थापन करावे लागतील.

(v) वर्तमान उद्योगांना आपला विस्तार करण्यासाठी परवाना प्राप्त करण्याची गरज असणार नाही.

उद्योगांत ५१ टक्केपर्यंत विदेशी भांडवल गुंतविण्याची मुभा दिली. या उद्योगात मुख्यत: प्रांडवली वस्तू, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू, अन्न प्रक्रिया करणारे उद्योग इत्यादींचा समावेश आहे. पलीकडे सरकारने पुन्हा ९ उद्योगात ७४ टक्केपर्यंत विदेशी भांडवल गुंतवणुकीस आपोआप मंजुरी देण्याचे धोरण स्वीकारले. या ९ उद्योगात मुख्यत्वे तेल आणि वायू इ. शी संबंधित खनन सेवा, आधारभूत धातू, मिश्र धातू, आपारंपरिक ऊर्जास्रोत, नौकानयन, हवामान खाते इत्यादीना लागणारी उपकरणे, विद्युत निर्मिती व पुरवठा, रस्ते बांधणी व दुरुस्ती, बंदरे, वीज निर्मिती केंद्राची उभारणी व देखभाल इत्यादीचा समावेश होतो.

भारताच्या १९९१ च्या औद्योगिक धोरणाचे मूल्यमापन फायदे

(1) मिश्र अर्थव्यवस्थेत सार्वजनिक क्षेत्राची भूमिका व्यापक व महत्त्वाची असते हे जरी मान्य केले तरी भारतात सार्वजनिक क्षेत्रावर विकासाचा जो बराच भार टाकण्यात आला होता तो भार समर्थपणे पेलण्यात सार्वजनिक क्षेत्र असफल ठरले होते आणि त्यामुळेच सार्वजनिक क्षेत्रातील अनेक उद्योग तोटा सहन करून कार्य करीत होते. नवीन औद्योगिक धोरणात सार्वजनिक क्षेत्रावरील विकासाचा भार

कमी करण्यात आला आहे, असेच म्हणावे लागेल. कारण या धोरणात सार्वजनिक क्षेत्रासाठी राखून ठेवलेले अनेक उद्योग खाजगी क्षेत्रासाठी खुले करण्यात आले आहे.

(२) औद्योगिक विकासाला जाचक ठरणारी परवाना पद्धती या धोरणाने संकुचित केली आहे. त्यामुळे उद्योग नोकरशाहीच्या जाचातून मुक्त झाले आहेत.

(३) उदारीकरणाचे धोरण देशाच्या जलद औद्योगिक विकासासाठी आवश्यक आहे हे निर्विवाद आहे. १९९१ च्या औद्योगिक धोरणात या उदारीकरणाच्या धोरणाचा पाया घालण्यात आला आहे. कारण उद्योगांना आपल्या विकासासाठी आवश्यक भांडवल, कच्चा माल, तंत्रज्ञान इ. आयात करण्याची मुभा देण्यात आली आहे.

(४) १९९१ च्या धोरणात जागतिकीकरणाचा देखील पाया घालण्यात आला आहे, असे म्हणावे लागते. कारण देशी उद्योगांच्या विकासासाठी सरळ विदेशी गुंतवणुकीला यात प्रोत्साहन देण्यात आले आहे.

(५) रोजगार निर्मितीच्या दृष्टीने लघु आणि कुटीर उद्योगांचे महत्त्व या धोरणात मान्य करण्यात आले आहे. परंतु लघु उद्योग आणि मोठे उद्योग यात स्पर्धेऐवजी ते परस्परांचे पूरक असावेत अशीच भूमिका या धोरणात घेण्यात आली आहे.

(६) उद्योगांचा आकार वाढून त्यांना जोपर्यंत उत्पादनाच्या अंतर्गत बचती जास्तीत जास्त प्रमाणात प्राप्त होत नाहीत तोपर्यंत त्यांचा उत्पादन व्यय न्यूनतम होऊ शकत नाही आणि उत्पादन व्यय न्यूनतम झाल्याशिवाय असे उद्योग आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्पर्धा करू शकत नाहीत. उद्योगांना आपली गुंतवणूक वाढविण्यात एकाधिकार आणि प्रतिबंधात्मक व्यापार व्यवहार कायदा बाधक होता.

या धोरणात या कायद्याच्या तरतुदीतून उद्योगांना म मुक्त करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

(७) शेवटी, या धोरणामुळे विदेशी भांडवल व विदेशी तंत्रज्ञानाच्या आयातीला । अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे.

टीका/दोष

(१) टीकाकारांच्या मते या धोरणात भांडवलासंबंधी सरकारने निश्चित केलेले धोरण भारतीय हितसंबंधांना बाधक ठरणारे आहे. सरकारने ५१ टक्क्यांपर्यंत सरळ विदेशी गुंतवणुकीला आपोआप मंजुरी मिळेल, असे घोषित केले आहे. परंतु ही गोष्ट नेहरू आकृतिबंधाच्या विरुद्ध आहे. कारण स्व. पंतप्रधान पंडित नेहरूंनी फक्त संक्रमणकाळात विदेशी भांडवल आयात केले जाईल, असे ठरविले होते.

(२) विदेशी भांडवल गुंतवणुकीमुळे आपली विदेशी मुद्रेची समस्या सुटेल आणि उच्च प्राथमिकता क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली जाईल ही भूमिका विदेशी मुक्त गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यामागे आहे. परंतु टीकाकारांच्या मते या प्रक्रियेत बहुराष्ट्रीय कंपन्यांचे प्रस्थ देशात वाढून देश आपली सार्वभौमिकता गमावून बसेल.

(३) विदेशी गुंतवणुकीचा पुरस्कार करणाऱ्यांच्या मते इतर देशांच्या मानाने भारतातील विदेशी गुंतवणीचे प्रमाण बरेच कमी आहे. १९८९ मध्ये ते फक्त ४२५ दशलक्ष डॉलर्स होते. त्यामुळे विदेशी भांडवलाच्या आयातीची काळजी करण्याचे कारण नाही, असे डॉ. मनमोहन सिंग यांचे मत आहे. परंतु याबाबतीत टीकाकारांचे म्हणणे असे आहे की, एकदा विदेशी भांडवलाला देशात मुक्त प्रवेश दिला तर उच्च प्राथमिकता क्षेत्रापुरतीच विदेशी भांडवलाची गुंतवणूक मर्यादित राहणार नाही तर कमी प्राथमिक क्षेत्रातदेखील विदेशी भांडवलाची गुंतवणूक

भारतात केली आहे. परंतु या गुंतवणुकीमुळे अपेक्षेप्रमाणे प्रक्रिया केलेल्या कृषी उत्पादनांची निर्यात वाढली नाही व रोजगारातदेखील वाढ झाली नाही.

(४) टीकाकारांच्या मते विदेशी भांडवलदार देशात आपल्या कंपन्या स्थापन केल्यानंतर आपला नफा व लाभांश आपल्या देशात पाठविण्याची मागणी करतील. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या या मागणीपुढे सरकार अगोदरच नमले आहे. परंतु विदेशी कर्जाचा भार बराच वाढलेला असल्यामुळे फक्त उच्च प्राथमिकता क्षेत्रातच विदेशी गुंतवणुकीला नियंत्रण देणे शहाणपणाचे आहे.

(५) टीकाकारांच्या मते निर्यात व्यापारात गुंतलेल्या कंपन्यात विदेशी भांडवलाचे स्वागत करणे शहाणपणाचे नाही. कारण देशी व्यापारी कंपन्यादेखील भारतीय मालासाठी विदेशी बाजारपेठा शोधू शकतात. शिवाय या व्यापाराला अत्याधुनिक तंत्रज्ञानाची मुळीच गरज नसते.

****